विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा-छत्रपती संभाजीनगर येथे विधिविषयक सखोल ज्ञान असलेल्या शासनाच्या विधि व न्याय विभागातून सेवानिवृत्त झालेल्या सहसचिव (विधि) / सॉलिसिटर(मु.वि.)-नि-उपसचिव / उपसचिव (विधि), गट अ (राजपत्रित) अधिकाऱ्यांमधून करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

विभागाची आवश्यकता व अटी आणि शर्ती :-

१) विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विधिविषयक कामांसाठी विधिविषयक सखोल ज्ञान असलेल्या विधि संवर्गातील शासनाच्या विधि व न्याय विभागातून सेवानिवृत्त झालेल्या सहसचिव (विधि) / सॉलिसिटर(मु.वि.)-नि-उपसचिव / उपसचिव (विधि), गट अ (राजपत्रित) अधिकाऱ्यांमधून ०१ पद करारपध्दतीने भरावयाचे आहे.

२) सदर सेवानिवृत्त अधिकारी शासनाच्या विधि व न्याय विभागातून सहसचिव (विधि) / सॉलिसिटर(मु.वि.)-नि-उपसचिव / उपसचिव (विधि), गट अ (राजपत्रित) या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

३) सदर अधिकाऱ्यास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

४) सदर नियुक्ती या कार्यालयातील सॉलिसिटर (मु. वि.)-नि-उपसचिव या पदावर अधिकारी उपलब्ध होईपर्यंत अथवा एक वर्षाच्या कालावधीसाठी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व दिनांक ०८ सप्टेंबर, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

५) सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७) नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास विधि व न्याय विभाग, शाखा-छत्रपती संभाजीनगर येथे काम करावे लागेल.

८) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी सहसचिव, विधि व न्याय विभाग, शाखा-छत्रपती संभाजीनगर यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व वेळोवेळी त्यांना कामकाज अहवाल सादर करतील.

९) उमेदवाराने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासून चार दिवसांच्या आत "सहसचिव, विधि व न्याय विभाग, पहिला मजला, जुनी उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५" या पत्त्यावर पोहोचेल अशारितीने पोस्टाने पाठवावा अथवा कार्यालयात प्रत्यक्ष दाखल करावा. अधिक माहितीसाठी ०२४०-२३३२२९२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

*****

## अर्जाचा नमुना

विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, शाखा-छत्रपती संभाजीनगर येथे विधिविषयक सखोल ज्ञान असलेल्या शासनाच्या विधि व न्याय विभागातून सेवानिवृत्त झालेल्या सहसचिव (विधि) / सॉलिसिटर(मु.वि.)-नि-उपसचिव / उपसचिव (विधि), गट अ (राजपत्रित) अधिकाऱ्यांमधून करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

उमेदवाराने अलिकडच्या काळातील

स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व कार्यालय :-

४. जन्म दिनांक व वय :-

५. सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

८. भ्रमणध्वनी क्रमांक :-

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर सूचनेतील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी